MHKO070000532006

**<u>नियमित दिवाणी दावा क्र.२०/२००६, निशाणी १३१ वर आदेश</u>**

**<u>(इसामुद्दीन इनामदार – विरुध्द – कुलसुमबी इनामदार)</u>**

अर्जदाराने प्रस्तुतचा अर्ज दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश १ नियम १० तसेच कलम १५१ अन्वये नियोजीत प्रतिवादी क्र.७ व त्यांचे तथाकथीत वारसांना दावेच्या कामातून वगळण्यात यावे याकरिता दाखल केला आहे.

**०२.** वादीचे कथन असे की, प्रस्तुतचा दावा हा खरेदीपत्र पुरे होवून मिळणेसाठी दाखल केलेला आहे. प्रस्तुत दाव्यातील प्रतिवादी क्र.७ हे दि.०२/०७/२०१८ रोजी मयत झालेले आहेत, त्यामुळे वादी यांनी त्यांचे नाव दाव्यामधून कमी करणेबाबत नि.११९ ला पुरसीस दिलेली आहे. त्यानंतर मयत प्रतिवादी क्र.७ यांच्या वारसांनी नि.११४ ला दावेकामी त्यांना समाविष्ठ करणेबाबत अर्ज दिला होता, तो अर्ज न्यायालयाने मंजूर करुन त्यांना दाव्याकामी पक्षकार केलेले आहे. वादी यांना मयत प्रतिवादी क्र.७ यांच्या वारसांना दाव्याकामी पक्षकार म्हणून समाविष्ठ करुन घ्यावयाचे नाही तसेच त्यांच्याविरुध्द कोणतीही दाद मागावयाची नाही. दावा खरेदीपत्राचा असून वादीने ज्यांच्याविरुध्द दाद मागीतलेली नाही त्यांना वादीच्या इच्छेविरुध्द दाव्यात सामील करण्याचा आदेश मा.न्यायालय करु शकत नाही असे मा.सर्वोच्च न्यायालयाचे निर्देश आहे. सबब, प्रतिवादी क्र.७ व त्यांचे तथाकथीत वारसांना दावेकामातून वगळण्यात यावे अशी विनंती प्रस्तुत अर्जाद्वारे केलेली आहे.

**०३.** प्रतिवादी क्र.७(४) व प्रतिवादी ७ (१ ते ३) यांनी प्रस्तुत अर्जास अनुक्रमे निशाणी १३४ व १३५ वर त्यांचे म्हणणे दाखल करुन वादीची कथने त्यांना मान्य व कबूल नसल्याचे सांगीतले आहे. पुढे त्यांनी असे कथन केले की, प्रतिवादी क्र.७ यांनी यापूर्वी पक्षकार म्हणून सामील करुन घेणेचा अर्ज दिला होता तो

गुणदोषावर चालून अर्ज मंजूर होवून दावेकामी पक्षकार करुन घेतले आहे. त्यानंतर प्रतिवादी क्र.७ यांनी कैफियत दाखल केली आहे. प्रस्तुत कामी वादी, त्यांचे साक्षीदार तसेच स्वतःचा जबाब दिला आहे, साक्षीदारांचा पुरावाही दिला आहे. प्रस्तुत कामात अंतिम युक्तीवादही केला आहे त्यानंतर प्रतिवादी क्र.७ हे मयत झालेवर त्यांचे वारस म्हणून प्रतिवादी क्र.७ चे वारस स्वतःहून हजर झाले आहेत. केवळ काम लांबवण्यासाठी प्रस्तुतचा अर्ज दाखल केलेला आहे. वादी यांनी सदर अर्जासाठी मा.सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाचा आधार घेतला आहे त्यामध्ये मा.सर्वोच्च न्यायालयासमोर असलेल्या प्रकरणामध्ये व या मा.न्यायालयासमोर असलेल्या प्रकरणामध्ये त्यातील घटना व घडामोडी यामध्ये खुप मोठा फरक आहे. वादी यांनी खोटया कराराआधारे मुदतबाहय मागणी करुन प्रतिवादींच्या मिळकतीत ढवळाढवळ करणेचा प्रयत्न केला आहे.

**०४.** प्रतिवादी पुढे असे कथन करतात की, प्रतिवादी क्र.७ बाबत त्यांच्या वारसाबाबत झालेले आदेश कायम झालेले आहेत. सदर आदेशाने प्रतिवादी क्र.७ व वारस हे दावा दाखल तारखेपासून पक्षकार झाले आहेत. नविन न्यायनिवाडे आले म्हणून पूर्वी झालेले अंतिम निर्णय पुन्हा नव्याने रद्द करणे हे कायदयास अभिप्रेत नाही या बाबीचा विचार करता वादीचा अर्ज चालणेस पात्र नाही. वादीचा अर्ज मंजूर केल्यास प्रतिवादी क्र.७ चे वारसांना तक्रारीप्रमाणे बाजू मांडण्यापासून वंचीत ठेवल्यासारखे होईल व ते नैसर्गिक न्यायाच्या विरुध्द राहणारे आहे. तसेच वादी यांनी सदरचा अर्ज कशाच्या आधारे व कोणत्या तरतूदीखाली दिला आहे हे स्पष्ट होत नाही. तसेच दावा अंतिम युक्तीवादासाठी प्रलंबीत आहे. प्रतिवादी क्र.७ चे वारस युक्तीवादासाठी तयार असताना सदरचा अर्ज दाखल करुन वादीने काम लांबणीवर टाकण्याचा प्रकार सुरु केला आहे. या सर्व बाबीचा विचार करता वादीचा प्रस्तुतचा अर्ज खर्चासह नामंजूर करावा अशी विनंती प्रस्तुत प्रतिवादी यांनी केली आहे.

**०५.** अभिलेखावरील कागदपत्रांचे अवलोकन केले. प्रस्तुतचा दावा प्रतिवादींविरुध्द खरेदीपत्र पुर्ण होवून मिळणेकरीता दाखल केलेला आहे. उभय पक्षकारांच्या विधीज्ञांचा युक्तीवाद ऐकला. वादी यांनी प्रस्तुत अर्जाच्या युक्तीवादापृष्टयर्थ खालील न्यायनिवाडयांचा आधार घेतलेला आहे.

| | |
|---|---|
| 1. | ***Gurumit Singh Bhatia Vs. Kiran Kant Robinson, 2019 SAR (Civil) 908.*** |
| 2. | ***Surinder Pal Soni Vs. Sohan Lal, 2019 SAR (Civil) 915***. |

**०६.** वादीने दाखल केलेल्या न्यायनिवाडयांचे अवलोकन केले असता असे दिसून येते की सदर न्यायानिवाडयांतील तथ्ये व प्रस्तुत दाव्यातील तथ्ये ही भिन्न आहेत. दोन्हींमध्ये इतकेच साम्य आहे की त्यामध्ये सदरचे दावे हे खरेदीपत्र पूर्ण होवून मिळणेसाठी दाखल केलेले आहेत. तसेच प्रस्तुत दाव्यातील प्रतिवादी क्र.७ किंवा त्यांचे वारस हे उत्तरवर्ती खरेदीदार(subsequent purchaser) नाहीत. त्यामुळे न्यायनिवाडयातील व प्रस्तुत दाव्यातील घटना व घडामोडी या भिन्न असल्याने मा.सर्वोच्च न्यायालयाच्या न्यायनिवाडयामध्ये निश्चीत केलेली मार्गदर्शक तत्वे किंवा प्रमाण प्रस्तुत अर्ज निकाली काढताना मदत करणारी नाहीत. या व्यतिरीक्त सदर न्यायनिवाडयातील प्रमाण पक्षकाराचे वारस किंवा प्रतिवादी म्हणून पक्षकार अभिलेखावर घ्यायचे किंवा नाहीत हे ठरवताना विचारात घेणे आवश्यक आहे. परंतू प्रस्तूत दाव्यात प्रतिवादी क्र.७ ला नि.क्र.७ वरील आदेशाने दाव्यात आवश्यक पक्षकार म्हणून समाविष्ट करण्यात आले होते व त्या आदेशाविरुध्द वादीने कोणतेही प्रस्तूत अर्ज दाखल करेपर्यंत अपील करुन हरकत घेतलेली दिसून येत नाही. त्यांना समाविष्ट केल्यानंतर त्यांनी त्यांची कैफियत दाखल करुन त्यांचे व इतर साक्षीदारांचे जबाबही नोंदवलेले असून प्रकरणात अंतीम युक्तीवादही केलेला आहे. परंतू दि.०२/०७/२०१८ रोजी प्रतिवादी क्र.७ मयत झालेने त्यांच्या वारसांनी स्वतः हजर होवून अर्ज दिल्याने नि.क्र.११४ मंजूर होवून त्यांनाही आवश्यक पक्षकार या नात्याने दावेकामी समाविष्ट करण्यात आलेले आहे.

**०७.** वादीने दाखल न्यायनिवाडयांचा आधार घेवून वादीने ज्यांच्याविरुध्द दाद मागीतलेली नाही त्यांना वादीच्या इच्छेविरुध्द दावेकामी सामील करण्याचे आदेश न्यायालय देवू शकत नसल्याचे कथन केले आहे. वादाकरीता प्रस्तुत न्यायानिवाडयातील प्रमाण/मार्गदर्शक तत्वे ही विचारात घेतली व त्या अनुषंगाने न्यायनिवाडयाचे अवलोकन केले असता ''कायदयाच्या नियमाची सक्ती असल्याशिवाय ज्यांच्याविरुध्द वादीला दाद मागायची नाही अशा व्यक्तीला दाव्यात

पक्षकार करणेसाठी वादीवर दबाव आणू नये'' असे प्रमाण निश्चीत केल्याचे दिसते. याचाच अर्थ कायदयाच्या नियमांची सक्ती असेल तर वादीच्या इच्छेविरुध्द आवश्यक व्यक्तीला पक्षकार करता येईल. प्रस्तुत प्रकरणात प्रतिवादी क्र.७ किंवा त्यांचे वारस हे आवश्यक पक्षकार आहेत या मताला हे न्यायालय सर्व बाबींचा विचार करुन पोहोचलेले आहे. न्यायालयास संपूर्णपणे व परिणामकारकरित्या सक्षमतेने दाव्यातील उद्भवलेल्या प्रश्नाचा निपटारा करण्यासाठी आवश्यक पक्षकार म्हणजेच प्रतिवादी क्र.७ व त्यांच्या मृत्युनंतर त्यांच्या वारसांची आवश्यकता आहे हे यापूर्वीच निश्चित केलेले आहे व हीच कायदयाच्या नियमाची सक्ती आहे असे माझे मत बनते. त्यामुळे प्रतिवादी क्र.७ व त्यांचे वारसांना वगळणेसाठी प्रस्तुतचा केलेला अर्ज मंजूर होणेस पात्र नाही. सबब मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करते–

**– आदेश –**

प्रस्तुत अर्ज (निशाणी १३१) नामंजूर करणेत येत आहे.

DISTRICT COURTS MAHARASHTRA
सत्यमेव जयते

Digitally signed by ROHINI ASHOK JADHAV
Date: 2022.03.17 18:37:19 +0530

दिनांकः– १६/०३/२०२२                    (**रोहिनी अ. जाधव**)
जयसिंगपूर.                    २ रे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर)
जयसिंगपूर.